दि. ११/७/२०२४

# वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

मा. सभासद बंधु, भगिनींनो,

आपल्या संस्थेचा ३७ वा वार्षिक आणि ३१ मार्च २०२४ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षाचा अहवाल संचालक मंडळाच्या वतीने आपणांपुढे सादर करण्यापूर्वी दु:खद घटनांची नोंद घेणे आवश्यक आहे. अहवाल सालात ज्ञात अज्ञात स्वातंत्र्यसेनानी, थोर नेते, तंत्रज्ञ, लेखक, संशोधक, शास्त्रज्ञ, साहित्यिक, कलावंत, पत्रकार, शिक्षणतज्ञ, सामाजिक कार्यकर्ते, संस्थेचे जे सभासद व त्यांचे नातेवाईक यांचे दु:खद निधन झाले, परमेश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो.

आपल्या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा मंगळवार दि. ३० जुलै २०२४ रोजी सायं.७.०० वाजता हॉटेल संजोग अॅण्ड लॉन, मनमाड रोड, अहमदनगर येथे आयोजित करण्यात आलेली आहे. सर्व सभासदांनी वेळेवर हजर राहून सहकार्य करावे.

## सभेपुढील विषय

१) मागील दि. २५/७/२०२३ च्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्तास मंजूरी देणे.

२) मा.ऑडिटर मे.ऋषभ एस. कटारिया असोसिएटस् यांनी सादर केलेल्या व कार्यकारिणीने मंजूर केलेल्या सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाचा तेरीज, ताळेबंद, नफा-तोटा पत्रक इत्यादी आर्थिक कागदपत्रांना मंजूरी देणे.

३) सन २०२४-२०२५ सालासाठी ऑडिटरची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना मंजूर करणे.

४) सन २०२४-२०२५ सालासाठी मा.अध्यक्ष, मा.उपाध्यक्ष तसेच कार्यकारिणीच्या नऊ सदस्यांची निवड करणे (नवनिर्वाचित अध्यक्ष या शिवाय दोन निमंत्रित सदस्य कार्यकारिणीत घेऊ शकतील.)

५) नवीन पदाधिकारी व कार्यकारिणी सदस्यांचा सत्कार व गतवर्षीच्या कार्यकारिणीस निरोप समारंभ.

६) बहुतांशी सभादांनी एसा भवन बांधकाम निधी दिलेला नाही, त्याबाबत विचार विनिमय करणे बाबत.

७) मा.अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळेचे विषय.

दि. ११/७/२०२४

इंजि. प्रदिप तांदळे
मानद सचिव
सन २०२३-२४



Scanned with OKEN Scanner

## सूचना

१) संस्थेच्या जमाखर्चाची सर्व कागदपत्रे व ऑडीट रिपोर्ट मा.खजिनदार श्री.वैभव फिरोदिया/अध्यक्ष श्री. रमेश कार्ले यांचे कार्यालयात त्यांचे कार्यालयीन वेळेत पाहता येईल. याबाबत काही प्रश्‍न व सूचना असल्यास दि. २५ जुलै २०२४ पूर्वी मा.खजिनदार श्री. वैभव फिरोदिया किंवा अध्यक्ष श्री. रमेश कार्ले यांच्याकडे लेखी स्वरूपात द्यावेत. आर्थिक प्रश्‍नांना ऐनवेळी उत्तर देणे बंधनकारक नसेल.

२) मा.अध्यक्ष, उपाध्यक्ष व कार्यकारिणीचे नऊ सदस्यांचे निवडीबाबत काही सुचना व निर्देश करावयाचे असल्यास सूचक, अनुमोदक सह्यांसह अशी नामांकन पत्रे सचिव श्री.प्रदिप तांदळे व अध्यक्ष श्री. रमेश कार्ले यांच्या कार्यालयात दि. २७ जुलै २०२४ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत सादर करावीत.

३) सुचित केलेल्या नामांकन पत्रांपैकी कोणालाही दि. २८ जुलै २०२४ रोजी सायं. ५ वाजेपर्यंत आपली नावे मागे घेता येतील.

४) नामांकित झालेली प्रस्तावित वैध यादी सभासदांकरिता दि. २९ जुलै २०२४ रोजी सकाळी ११ नंतर मा.सचिव यांचे कार्यालयात उपलब्ध करुन देण्यात येईल.

५) अशाप्रकारच्या कोणत्याही सूचना व नामांकन पत्रे हजर न झाल्यास अथवा एकापेक्षा जास्त नामांकन पत्रे आल्यास सभेच्या वेळेस नवीन पदाधिकारी व सदस्य यांच्या निवडीबद्दल घटनेत नमूद केल्याप्रमाणे मा.अध्यक्ष निर्णय घेतील.

६) सभेनंतर त्याच ठिकाणी सुरुची भोजन आयोजित करण्यात आले आहे.

७) कोरमअभावी सभा तहकूब करण्यात आल्यास अर्ध्यातासाने त्याच ठिकाणी त्याच दिवशी सभा घेण्यात येईल व त्यास कोरमची आवश्यकता राहणार नाही व ती सभा वैध समजण्यात येईल.

८) संचालक किंवा अन्य कोणत्याही पदासाठी अर्ज दाखल करणारा सभासद एक तर ऐसा सिटी मध्ये मूळ भूखंडधारक असावा अथवा ऐसा भवन बांधकाम निधी रक्कम रुपये २१०००/- २६ जुलै २०२४ पूर्वी एसा भवन कमिटीकडे जमा केलेली असावी.



Scanned with OKEN Scanner